## // प्रेस नोट //

दिनांक ०३/०९/२०१८

**लोकसेवक सुभाष बालचंद कट्टे, वय ४८ वर्षे, धंदा नौकरी, नायब तहसिलदार, पुरवठा विभाग तहसिल कार्यालय आष्टी वर्ग-२ यांना २,०००/- रुपयाची लाच घेतांना रंगेहात पकडले.**

---

आज दि.०३/०९/२०१८ रोजी तक्रारदार यांनी ऐसीबी कार्यालयात हजर येवून तक्रार दिली की, तक्रारदार यांचे सस्थेच्या नावे असलेल्या स्वस्त धान्य दुकानाचा वार्षाक तपासणीचा चांगला अहवाल वरिष्ठ कार्यालयाला पाठविण्यासाठी नायब तहसिलदार कट्टे, पुरवठा विभाग,तहसिल कार्यालय,आष्टी हे २,०००/- रुपये लाचेची मागणी करीत आहेत. वगैरे मजकुराची तक्रार तक्रारदार यांनी दिली.

सदर तक्रारीवरुन आज दिनांक ०३/०९/२०१८ रोजी आष्टी येथे पंचासमक्ष लाच मागणी बाबत खात्री केली असता नायब तहसिलदार कट्टे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे कामासाठी २,०००/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केले.

त्यावरुन आज दिनांक ०३.०९.२०१८ रोजी लोकसेवक कट्टे, नायब तहसिलदार यांचे विरुध्द तहसिल कार्यालय,आष्टी परिसरात लाचेचा सापळा आयोजित केला असता लोकसेवक कट्टे, यांना तक्रारदार यांचेकडून २,०००/- रुपयाची लाच रक्कम स्विकारतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे. लोकसेवक सुभाष बालचंद कट्टे, वय ४८ वर्षे, धंदा नौकरी, नायब तहसिलदार, पुरवठा विभाग तहसिल कार्यालय आष्टी वर्ग-२ यांचे विरुध्द पोस्टे आष्टी येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा २०१८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया चालु आहे.

सदरची कारवाई मा.श्री.श्रीकांत परोपकारी साहेब,पोलीस अधीक्षक,मा.श्री.एस.आर.जिरगे साहेब,अपर पोलीस अधीक्षक, ऐसीबी औरंगाबाद यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप अधीक्षक श्री.बाळकृष्ण हनपुडे पाटील, पोह/दादासाहेब केदार,अशोक ठोकळ,पोना/विकास मुंडे,अमोल बागलाने,चापोह सय्यद नदिम, ऐसीबी बीड यांनी केली आहे.

याद्वारे नागरिकांना आवाहन करण्यात येते की,त्यांचे सरकारी कामासाठी लोकसेवक लाचेची मागणी करीत असल्यास त्यांनी खालीलप्रमाणे संपर्क साधावा.

| | | |
|---|---|---|
| टोल फ्री क्रमांक | :- | १०६४ |
| दुरध्वनी क्रमांक | :- | ०२४४२/२२२६४९ |
| मेल आयडी | :- | dyspacbbeed@gmail.com |
| वेबसाईट | :- | www.acbmaharashtra.gov.in |
| मोबाईल ॲप | :- | www.acbmaharashtra.net |
| फेसबुक पेज | :- | www.facebook.com/MaharashtraACB |

03/09

पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,बीड.
करिता.